# महाराष्ट्र विधानसभा

**द्वितीय अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## राज्यातील शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील केंद्रप्रमुख पदाच्या जागा रिक्त असल्याबाबत

**(१) ३४२९९ (१२-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील केंद्रप्रमुख पदाच्या ३ हजार जागा रिक्त असल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या नुसार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्रप्रमुखाच्या रिक्त जागा भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) व (२) केंद्रप्रमुख पदे भरली जात नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने दि.०१.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये व दि.०९.०३.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये केंद्रप्रमुख पदी निवड व पदोन्नतीच्या अनुषंगाने (पदभरतीबाबतचे प्रमाण व अर्हता इ.) तरतूदी सुधारित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार केंद्रप्रमुख पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य खंड प्रकाशित करण्याबाबत

**(२) ४००४८ (२५-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १० ग्रंथ प्रकाशनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे असल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यातील काही ग्रंथ हे १० ते १५ वर्षापूर्वीच तयार झाले आहेत, या ग्रथांना प्रकाशनाची मान्यता मिळणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन निधीची तरतूद करुन ही ग्रंथसंपदा प्रकाशित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (११-१०-२०२३) :** (१) अंशत: हे खरे आहे.
(२) अंशत: हे खरे आहे.
(३) अ) इंग्रजी खंड क्र.६ च्या मराठी अनुवादाचे प्रकाशन दि. १६ डिसेंबर,२०२१ रोजी मा. उप मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले.
ब) खंड क्र ८, खंड क्र.१०, खंड क्र. १३, खंड क्र.६ (इंग्रजी) खंड क्र.१३ चा मराठी अनुवाद, सोअर्स मटेरियल खंड क्र.१ यांचे प्रकाशन करण्यात आले आहे.

क) खंड क्र.२३, खंड क्र.१७ भाग १, खंड क्र. ४, खंड क्र. १२, खंड क्र. १५, खंड क्र १८(१ ते ३) छापण्यात आलेले आहेत. इंग्रजी खंड दोन चा मराठी अनुवाद भाग-१ व भाग-२ ची छपाई सुरु आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**राज्यात कोविड १९ च्या पार्श्वभुमीवर विद्यार्थ्यांकडून घेतल्या जाणा-या विविध शुल्काबाबत**

**(३) ४३३४१ (०४-०४-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक १५ जुलै, २०२१ रोजीच्या शासननिर्णयाद्वारे (संकिर्ण २०२१/प्र.क्र.८२/विशी -३) कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांकडून घेतल्या जाणा-या विविध शुल्का संदर्भात शासन शिफारशी करण्यासाठी शासनाने समिती नियुक्ती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ पर्यंतचा अहवाल देण्यात आला आहे काय, तसेच समितीस मुदतवाढ देण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने विविध ठिकाणी आणि विद्यार्थी संघटना यांची मते मांडण्यासाठी सुनावणी घेतली आहे काय,
(४) असल्यास, याबाबत सदर समितीने शासनास केलेल्या शिफारशींबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय व यास्तव किती विद्यार्थ्यांना कोणकोणत्या शुल्कांमध्ये सवलती मिळाल्या आहेत वा देत आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) उच्च व तंत्र शिक्षण, शासन निर्णय, दिनांक १५.०७.२०२१ अन्वये श्री.चिंतामणी जोशी, सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शिफारशींसह एक महिन्यात शासनास सादर करणे अभिप्रेत होते. समितीच्या सदस्य सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार सदर समितीची बैठक कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर काही अपरिहार्य कारणास्तव विहित कालावधीत झाली नाही. तथापि, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये सवलत देण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने दि.२८.०६.२०२१ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृष्य प्रणालीद्वारे कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे यांचेसह बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांचे आई/ वडील/ पालक कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे पदवी/ पदव्युत्तर शिक्षण पुर्ण होई पर्यंतचे संपूर्ण शुल्क माफ करण्याबाबत, अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विनाअनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणा-या इतर शुल्कामधील ज्याबाबींवर कोणत्याही प्रकार खर्च करण्यात आलेला नाही त्याबाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्याबाबत तसेच प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत सर्व अकृषि विद्यापीठांना दिनांक ३०.०६.२०२१ च्या पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार विद्यापीठांकडून कार्यवाही करण्यात येत असल्याने सदर समितीला आपला अहवाल सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली नाही.

---

**राज्यातील विशेषत: सोलापूर जिल्हयातील विज्ञान शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४) ४६८८९ (१७-०९-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या २ हजार ७९८ शाळांसह राज्यातील १ लाख ९ हजार शाळांमध्ये विज्ञानाचे जवळपास १३ हजार शिक्षक कमी असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विज्ञान शिक्षकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकराजा राजश्री शाहू महाराज गौरव ग्रंथ छपाईबाबत**

**(५) ५१०५७ (१८-०१-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकराजा राजश्री शाहू महाराज यांचे जीवन, कार्य व कर्तुत्व यावर प्रकाश टाकणाऱ्या शाहू गौरव ग्रंथाची छपाई लांबणीवर पडली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाहू महाराजांचा गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावरील राजर्षी शाहू गौरव ग्रंथ हा १२६८ पानांचा मोठा ग्रंथ आहे. तो हाताळण्यासाठी आणि वाचकांना सोयीचा नसल्यामुळे पुढील आवृत्ती दोन खंडामध्ये प्रसिध्द करण्याचा निर्णय राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीने घेतला आहे.

दोन्ही खंड मुद्रीतांचे शोधन पूर्ण करुन छपाईसाठी तयार आहेत. छपाई नंतर ग्रंथ सर्वांसाठी उपलब्ध होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यास मान्यता देण्याबाबत**

**(६) ५३४४८ (१८-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्याचे पूर्ण स्वातंत्र्य हवे असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील स्वायत्त संस्था वेगवेगळ्या नियमांनुसार चालविल्या जात असून महाविद्यालयांना स्वतःचे शुल्क आकारण्याची परवानगी आहे, तर राज्याच्या काही भागात सार्वजनिक विद्यापीठ त्यांना तशी परवानगी देत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्वायत्त महाविद्यालयांच्या समस्या जाणून घेण्यासाठी स्थापन केलेल्या समितीने विद्यापीठांसाठी, राज्याच्या उच्च आणि तांत्रिक विभागासाठी आणि केंद्राच्या शिक्षण मंत्रालयासाठी काही शिफारशी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समितीने केलेल्या शिफारशींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) स्वायत्त महाविद्यालयांसंदर्भातील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियम, २०१८ मधील सुचनांच्या अंमलबजावणीसाठी दिनांक १४ जानेवारी, २०१९ च्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम, २०१८ निर्गमित करण्यात आले होते व त्याची अंमलबजावणी होत होती.
पुणे विभागातील स्वायत्त महाविद्यालयांच्या प्रश्नांबाबत तत्कालीन मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दि.३१.०५.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्देशांनुसार स्वायत्त महाविद्यालयांच्या प्रश्नांबाबत संचालनालयस्तरावरुन संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली २५ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. समितीने सादर केलेल्या अहवालात विद्यापीठस्तरावर, उच्च व तंत्रशिक्षण विभाग स्तरावर आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार व विद्यापीठ अनुदान स्तरावर करावयाच्या कार्यवाहीबाबत शिफारशी केल्या होत्या. उच्च व तंत्रशिक्षण विभागस्तरावर करावयाच्या कार्यवाहीमध्ये आर्थिक बाबींच्या अनुषंगाने

(१) स्वायत्त महाविद्यालयांना खर्चावर आधारीत शुल्क निर्धारणाचे शुल्क ठरविण्याचे स्वतंत्र अधिकार असावेत.

(२) राज्य शासनाने स्वायत्त महाविद्यालयांना काही निकषांच्या आधारे प्रोत्साहन निधी उपलब्ध करुन द्यावा अशा शिफारशी केल्या होत्या.

परंतु, विद्यापीठ अनुदान आयोगाने उपरोक्त विनियम, २०१८ रद्द करुन त्याऐवजी नव्याने विनियम, २०२३ दिनांक ३ एप्रिल, २०२३ च्या अधिसूचनेन्वये अधिसूचित केले. त्यामुळे, राज्याचे एकरुप परिनियम, २०१८ रद्द करुन विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनियम, २०२३ तसेच विद्यापीठ अनुदान आयोग यासंदर्भात वेळोवेळी करेल त्यासूचना सर्व संलग्न महाविद्यालये, संस्था, घटक महाविद्यालयांना लागू करण्याबाबतचे एकरुप परिनियम क्र.३/२०२३, संकिर्ण-२०२३/प्र.क्र.९८/विशि-३, दिनांक २२.०५.२०२३ च्या अधिसूचनेन्वये अधिसूचित केले आहेत. सदर विनियमामध्ये स्वायत्त महाविद्यालय त्यांच्या स्तरावर राज्यशासन/ संवैधानिक परिषदांकडून लागू करण्यात आल्याप्रमाणे पाठ्यक्रम शुल्क निर्धारीत करु शकतील. या तरतूदीचा त्यात समावेश असून युजीसी कडून स्वायत्त महाविद्यालयांना देण्यात येणा-या वित्तीय सहाय्याची तरतूद या विनियमात वगळण्यात आली आहे.
सद्यस्थितीत राज्यात स्वायत्त महाविद्यालयासंदर्भातील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियम, २०२३ ची अंमलबजावणी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तंत्र शिक्षण संचालनालयातील “निदेशक” पदनामाबाबत

**(७) ५७५८२ (२४-०४-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तंत्र शिक्षण संचालनालयातील तांत्रिक कर्मचाऱ्यांचे पदनाम बदलून “निदेशक” पदनाम करण्यात आले असून याबाबत शासन निर्णय दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांचे वेतन मागील ५ वर्षांपासून निदेशक पदनामाने काढण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०१-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या पदनामात शासनाच्या दि.२७/९/२०१७ रोजीच्या आदेशानुसार बदल करून सेवार्थ प्रणालीमध्ये निदेशक पदनामाचा समावेश करण्यात आलेला आहे. पदनाम बदलानंतरही सदर पदनामांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये बदल होणार नसल्याचे व या पदनामांच्या मूळ वेतनश्रेणीत / वेतनसंरचनेत कोणताही बदल होणार नसल्याचे वरील आदेशात स्पष्ट करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तंत्र शिक्षण संचालनालयातील कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(८) ५७६८४ (२४-०४-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंत्र शिक्षण संचालनालयातील कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रतिपूर्तीचे देयके मागील ४ वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय तंत्र निकेतन मध्ये कंत्राटी अधिव्याख्यातांना नियमित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकूण किती अधिव्याख्यातांना नियमित करण्यात आले आहे तसेच कंत्राटी अधिव्याख्यातांना नियमित करताना अपात्र कर्मचाऱ्यांना नियमित करण्यात आले असून याबाबत चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीस अहवाल सादर करण्यास एकूण किती कालावधी लागणार आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२५-१०-२०२३) :**(१) नाही

(२) व (३) मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १९.१०.२०१३ रोजीच्या आदेशानुसार तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०६.०१.२०१५ रोजीच्या निर्णयानुसार शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांतील ६६ अध्यापक व शासकीय तंत्रनिकेतनांतील ४६४ अध्यापक असे एकूण ५३० कंत्राटी अध्यापकांच्या सेवा नियमित करण्यात आल्या आहेत. याबाबत, दिनांक ०२.१२.२०१९ रोजीच्या आदेशान्वये एक सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

(४) व (५) चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यानुसार, पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यात गुटखा व पान मसाला यांचे उत्पादन, विक्री व अवैध वाहतुक होत असल्याबाबत**

**(९) ५८३७१ (२४-०४-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा व पान मसाला यांचे उत्पादन, विक्री व वाहतूक यावर बंदी असतांना देखील काही कंपन्यांना विक्री परवाने देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत बंदी घातली असताना देखील आणि तरुण वर्गाला या व्यसनाच्या आहारी जाण्यापासून रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१२-१०-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने काही कंपन्याना गुटखा व पान मसाला या पदार्थांचे विक्रीचे परवाने दिले असल्याची बाब निदर्शनास आली नाही. तथापि, संगणक प्रणालीच्या बदलाच्या वेळी data transfer करताना तांत्रिक दोषामुळे काही परवाने चुकीचे मंजूर झाल्याची बाब निर्दशनास आल्यानंतर चुकीचे परवाने तात्कळ दुरूस्त (Modify) करण्यात आले आहेत.
(२) तरुण वर्गाला या व्यसनाच्या आहारी जाण्यापासून रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये गुटखा व पान मसाला यांचे उत्पादन, वाहतूक, साठवणूक व विक्री करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. गुटख्याची अवैध उत्पादन, वाहतूक, साठवणूक व विक्री होताना आढळल्यास संबंधितांवर वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर (पुणे) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१०) ५८३८५ (२४-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (पुणे) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ३५७ शाळा असून यामधील मंजूर मुख्याध्यापकांच्या पदांपैकी ३० पदे रिक्त असून उपशिक्षकांचीही १६७ पदे रिक्त आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकांवर शिकवणुकीचा अतिरिक्त ताण येऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) आयबीपीएस कंपनीमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील खरेदी केंद्रावर शासनाचा शिक्का असलेल्या बारदानाची व्यापा-यांमार्फत विक्री होत असल्याबाबत

**(११) ५८७९७ (२४-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात आधारभूत भात खरेदी केंद्रावर शासनाचा शिक्का असलेले बारदान व्यापाऱ्यांमार्फत विक्री होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१९-१०-२०२३) :**(१) अशी कोणतीही तक्रार शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेली नाही. तथापि, धान खरेदीमध्ये अनियमितता व गैरव्यवहार झालेला असल्याने व्यापाऱ्यांमार्फत बारदान विक्री झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.
(२) उपप्रादेशिक कार्यालय, शहापूर अंतर्गत धान खरेदीमध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गांभीर्य लक्षात घेता हंगाम २०२२-२३ मध्ये तपासणी पथक नियुक्त केले असून पथकामार्फत तपासणी करुन चौकशीत दोषी आढळून आलेले संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शहापूर पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र.०२३८ अन्वये गुन्हे दाखल केले आहेत. तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना दि.१७.०७.२०२३ रोजी निलंबित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव ( जि.बुलढाणा) तालुक्यातील तूर गुजरातसह परराज्यात विक्रीसाठी जात असल्याबाबत**

**(१२) ५९८१६ (११-०५-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात शासनाकडून तूर खरेदी हमी भाव आधारभूत केंद्र सुरु न झाल्याने व आधारभूत किंमतीपेक्षा तुरीला खुल्या बाजारात अधिक भाव मिळत नसल्याने गुजरातसह परराज्यात विक्रीसाठी जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील तूर खरेदी हमी भाव आधारभूत केंद्र सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२५-१०-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) हंगाम २०२२-२३ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार राज्यात तूर नोंदणी दि.२१/०१/२०२३ पासून सुरु करण्यात आली होती. तसेच खरेदी दि.०१/०२/२०२३ पासून सुरु करण्यात आली असून खरेदीची अंतिम मुदत दि.३०/०४/२०२३ पर्यंत होती. हंगाम २०२२-२३ साठी केंद्र शासनाने तुरीचे आधारभूत दर ६६००/- प्रति क्विंटलप्रमाणे निश्चित केले होते.

बुलढाणा जिल्हयात पणन महासंघामार्फत एकूण ८ खरेदी केंद्र सुरु करण्यात आलेले असून जानेवारी २०२३ मध्ये तुरीचे बाजारभाव ६७०० ते ७००० पर्यंत होते. बाजारभाव आधारभूत दरापेक्षा जास्त असल्याने या कालावधीमध्ये शेतकरी नोंदणी झालेली नाही.

खामगाव तालुक्यात विदर्भ पणन महासंघ यांच्या मार्फत खरेदी करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरपना (ता.जि.चंद्रपूर) पैनगंगा नदीवर पुल बांधण्याबाबत**

**(१३) ६०८७९ (२५-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपना (ता.जि.चंद्रपूर) येथील चंद्रपूर-यवतमाळ जिल्हयाच्या सीमेवरील वाहणा-या पैनगंगा नदीवरील गांधीनगर-तेजापूर नदीघाटावर पुल नसल्याने या परिसरातील नागरिकांना नावेच्या सहाय्याने जीवघेणा असुरक्षित प्रवास करावा

लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नदीच्या दक्षिण किना-यावर कोरपना तालुक्यातील गांधीनगर
(कोंडशी ब्रु) गाव वसले असून पैलतीरावर उत्तर भागात वणी तालुक्यातील तेजापुर गांव आहे व दोन्ही गांवातील अंतर नदीमार्गे जेमतेम २ किमी आहे मात्र या दोन्ही गावांमध्ये नदी येत असल्याने हेच अंतर वेळाबाईमार्गे ५२ किमी एवढे होते, हे हि खरे आहे काय ?
(३) असल्यास, उक्त नदीवर पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-११-२०२३) :** (१) अशी बाब विभागाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) व (३) निधीची उपलब्धता विचारात घेता, विषयांकीत काम हे प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यात जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(१४) ६४६५७ (३०-०८-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन पालघर जिल्ह्याची निर्मिती होऊन ९ वर्षे झाली तरी जिल्हा पातळीवरील ग्राहक तक्रार निवारण आयोग सुरु करण्यात आलेले नसून ते आजही ठाणे तेथेच सुरु असल्याने ग्राहकांना तक्रार निवारण करण्यासाठी ठाणे येथील कार्यालयावरच अवलंबून राहावे लागत असल्याने पालघर जिल्ह्यातील ग्राहकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ग्राहक तक्रार निवारण आयोग, पालघर येथे सुरु करण्यासाठी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, ठाणे व राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांना पालघर जिल्ह्यातील नागरिकांनी वारंवार पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग २ च्या मागणीच्या अनुषंगाने पालघर येथे ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे कार्यालय सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (३१-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) ठाणे जिल्ह्याच्या विभाजनातून पालघर जिल्हा निर्माण होण्यापूर्वी तत्कालीन ठाणे जिल्ह्याकरीता ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत ठाणे जिल्ह्यामध्ये जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, ठाणे व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अतिरिक्त ठाणे असे दोन मंच कार्यरत होते. ठाणे जिल्ह्यातील शहरीकरण तसेच ठाण्यातील जिल्हा आयोगात दाखल होणाऱ्या ग्राहक तक्रारींची संख्या ही अधिक असल्याने विभाजनानंतरच्या ठाणे जिल्ह्याकरीता दोन ग्राहक आयोग कार्यरत ठेवण्यात येऊन पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र मंच निर्माण करण्यासाठी आवश्यक पद निर्मीतीचा प्रस्ताव विचाराधीन होता. दरम्यानच्या काळात ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ हा दि.२०.७.२०२० पासून लागू झाल्याने ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अंतर्गत पालघर जिल्ह्याकरीता स्वतंत्र आयोग गठीत करण्यासाठी अध्यक्ष, सदस्य व आयोग व मध्यस्थीकक्षासाठी आवश्यक कर्मचारी असा एकुण १७ पदनिर्मीतीचा प्रस्ताव नव्याने सादर करण्यात आला असून विचाराधीन आहे. पदनिर्मीतीस मान्यता प्राप्त झाल्यानंतर आयोग गठीत करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे बाबत**

**(१५) ६४६८६ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी प्रा.रंगनाथ पाठारे समितीचा ४३५ पृष्ठांचा अहवाल दिनांक १२ जुलै, २०१३ रोजी वा त्या सुमारास महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे पाठविल्यानंतर दहा वर्षे पाठपुरावा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.केंद्रीय सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री यांनी एक वर्षापासून संसदेत "लवकरच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत निर्णय घेतला जाईल, यावर सध्या आंतरमंत्रालयीन विचार सुरु आहे", असे सांगितल्यानंतर एक वर्षाचा कालावधी उलटूनही अभिजात भाषेसाठीचे सर्व निकष मराठी भाषा पूर्ण करीत असतानाही केंद्र शासनाकडून महाराष्ट्राच्या या न्याय मागणीकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १ मे रोजी महाराष्ट्र दिनाबरोबरच मराठी राजभाषा दिन साजरा होत असल्याने यादिवशी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करावा व यासाठी राज्य शासनाने पाठपुरावा करावा, अशी मागणी विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी शासनाकडे त्यांच्या दिनांक २७ एप्रिल, २०२३ च्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे व मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे ,

(५) असल्यास, याबाबत उचित कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१३-१०-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय. सदर प्रस्तावाबाबत महाराष्ट्र शासनाकडून सर्वच स्तरातून वारंवार व सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुनही मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र शासनाकडे दीर्घ कालापासून प्रलंबित आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांचे स्वाक्षरीने मा.पंतप्रधान महोदयांना दि.२४.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने दि.०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा राज्य शासनाचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रालयाच्या विचाराधीन असून त्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे कळविले आहे. तद्नंतर मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या दि.१४.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा. मंत्री, संस्कृती मंत्रालय, केंद्र शासन यांना मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत विनंती केली आहे. तसेच सचिव, मराठी भाषा यांच्या दि.०५.०७.२०२३ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात संस्कृती मंत्रालय, केंद्र शासन यांच्याकडे विचारणा करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत संस्कृती मंत्रालय, केंद्र शासन यांनी दि.१७.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये साहित्य अकादमीच्या अंतर्गत असलेल्या भाषा तज्ज्ञ समितीने एखाद्या भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचे पुनर्निश्चित केलेले निकष हे संस्कृती मंत्रालयाच्या विचाराधीन असल्याचे पश्चिम क्षेत्रीय परिषदेस कळविले आहे.

तसेच सचिव, मराठी भाषा यांच्या दि.३०.०८.२०२३ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये सुधारीत निकष कळविण्याबाबत संस्कृती मंत्रालय, केंद्र शासन यांच्याकडे विनंती केली आहे.

---

**सेतू बंधन योजनेतून किंवा ५० : ५० रेल्वे व राज्य शासनाचे सहभागातून येवला (जि.नाशिक) तालुक्यातील तीन रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल (ROB) बांधण्याबाबत**

**(१६) ६४६९८ (३०-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील तीन रेल्वे क्रॉसिंगवर सेतू बंधन योजनेतून किंवा ५० : ५० रेल्वे व राज्य शासनाच्या सहभागातून उड्डाणपूल (ROB) बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ मे, २०२३ तसेच दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास सार्वजनिक बांधकाम मंत्री व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक पूर्व यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास , उक्त उड्डाणपुलांचे बांधकाम ५० : ५० रेल्वे व राज्य शासन सहभागातून करण्यासाठी मध्य रेल्वे अहमदनगर यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक पूर्व यांना प्रस्ताव पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील रेल्वे उड्डाणपुलांच्या बांधकामांसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२, दिनांक २७ मे, २०२३ व दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सेतू बंधन योजनेतून किंवा ५० : ५० रेल्वे व राज्य शासनाचे सहभागातून येवला (जि.नाशिक) तालुक्यातील तीन रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल (ROB) बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) मध्य रेल्वे, अहमदनगर यांच्याकडून दि.०६ ऑक्टोबर, २०२२ व दि. ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये रेल्वे क्रॉसिंग क्र. ७४,७६ व ७७ या ठिकाणी रेल्वे व राज्य शासन ५०:५० सहभागातून रेल्वे उडडाणपूल प्रस्तावित करण्यात आले आहेत.

(३) सार्वजनिक बांधकाम (पूर्व)कार्यकारी अभियंता विभाग नाशिक,यांच्यामार्फत रेल्वे क्रॉसिंग क्र. ७६ व ७७ करीता दि.२४/११/२०२२ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे ना-हरकत प्रमाणपत्रांची मागणी केली आहे.

(४) व (५) सार्वजनिक बांधकाम विभाग (पू), नाशिक कार्यालयाकडून मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांना ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेस्तव दि.२४.११.२२ रोजी पत्र पाठविण्यात आले असून मध्य रेल्वेने केलेल्या विनंतीस अनुसरुन प्रकल्पाच्या संयुक्तीक तपासणी व व्यवहार्यता अभ्यास कारणास्तव सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ येवला येथील शाखा अभियंता यांची नेमणूक करण्यात आली असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**मुंबई विद्यापीठात सुरू झालेल्या डॉ .बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटर फॉर सोशल जस्टीस या संशोधन केंद्राबाबत**

**(१७) ६४९४८ (२८-०८-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९ व्या जयंतीचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठात सुरु झालेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटर फॉर सोशल जस्टीस या संशोधन केंद्रास विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येऊनही केंद्राच्या कामास अद्यापही सुरुवात करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार सदर केंद्र लावकारात लवकर पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९ व्या जयंतीचे औचित्य साधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटर हे संशोधन केंद्र सुरु करण्यात आले आहे.
(२) सदर केंद्राचे बांधकाम करण्यासाठी विद्यापीठाकडून वास्तुविशारद यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी Conceptual Design तयार करुन विद्यापीठाकडे सादर केले असून, यासंदर्भात विद्यापीठ स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जत (जि.रायगड) येथील युनिव्हर्सल बिझनेस स्कुल (युबीएस) मधील बीबीए पदवी अभ्यासक्रमाची चौकशी करणेबाबत

**(१८) ६५२९६ (२९-०८-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) येथील युनिव्हर्सल बिझनेस स्कुल (युबीएस) मध्ये कोणत्याही मान्यते शिवाय सुरू असलेल्या बीबीए ची पदवी अभ्यासक्रमाची उच्च शिक्षण विभागाने विभागीय संचालकांना चौकशी करण्याचे आदेश देऊन अहवाल सादर करण्याचे दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शिक्षण संस्थे मार्फत इंग्लंडची बीबीए पदवी विद्यार्थ्यांना देण्यात आल्या नंतर उच्च शिक्षणासाठी या पदवीला ग्राह्य मानत नसल्याचे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आल्याने संस्थेने अभ्यासक्रमासाठी भारतीय विश्वविद्यालय संघ या संस्थेची समकक्षता घेतली नसल्याने तसेच अन्य नियामक संस्थेची मान्यता न घेताच हा अभ्यासक्रम शिकवला जात असल्याचे विद्यार्थ्यांनी तक्रारी मध्ये नमूद केले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची गंभीर दखल घेत शिक्षण विभागाने महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्यविज्ञान, आरोग्यविज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था व पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार संस्थेची चौकशी करण्याचे निर्देश विभागीय सहसंचालकांना देऊन प्रत्यक्ष चौकशी करून त्याबाबतचा अहवाल स्पष्ट अभिप्राय व आवश्यक कागदपत्रासह संचालनालयास तात्काळ सादर करण्याचे निर्देश दिले आहेत व त्या नुसार अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (३१-१०-२०२३) :** (१) कर्जत (जि.रायगड) येथील युनिव्हर्सल बिझनेस स्कुल (युबीएस) मध्ये कोणत्याही मान्यते शिवाय सुरू असलेल्या बीबीए ची पदवी अभ्यासक्रमाची उच्च शिक्षण विभागाने विभागीय संचालकांना चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत दि.08.05.2023 रोजी कळविले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल यांनी चौकशी करून त्यांचा अहवाल दिनांक २२.०५.२०२३ च्या पत्रान्वये शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे सादर केला आहे. सदर अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यासपाठ्यक्रम प्रतिबंध अधिनियम, २०१३ मधील कलम ६ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणुन आवश्यक कार्यवाही करणेबाबत संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांना

शासनाचे दिनांक १४.०७.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुदखेड (जि.नांदेड) शहरातील रेल्वे स्टेशनजवळील भुयारी मार्ग नागरिकांना खुला करण्याबाबत**

**(१९) ६५४६४ (२८-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुदखेड (जि.नांदेड) शहरातील रेल्वे स्टेशनजवळील भुयारी मार्ग पूलाचे काम पुर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भुयारी मार्ग पुलाचे उदृघाटन न झाल्यामुळे अद्याप सदर मार्ग खुला करण्यात आला नाही त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या भुयारी मार्गाचे उदृघाटन करुन तो नागरिकांसाठी खुला करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-१०-२०२३) :** (१), (२) व (३) भुयारी मार्गाचे काम पुर्ण झाले आहे. पोच मार्गाचे काम लवकरच पुर्ण करून वाहतूकीस उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन वस्त्रोद्योग धोरणात उद्दिष्टे कमी केल्याबाबत**

**(२०) ६५६१८ (३०-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने नवे वस्त्रोद्योग धोरण जाहीर केल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्वीच्या वस्त्रोद्योग धोरणाच्या तुलनेत नव्या वस्त्रोद्योग धोरणात रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट १० लाखांवरून ५ लाखांवर तर गुंतवणुकीचे उद्दिष्ट ३६ हजार कोटी रुपयांवरून २५ हजार कोटी रुपयांपर्यंत कमी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उद्दिष्ट्ये कमी करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१३-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२३ अन्वये एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर केले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंतर्गत रुपये ३६००० कोटी गुंतवणुकीचे व १० लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्टे ठरविण्यात आले होते. मार्च २०२३ अखेर रुपये २१३०७.८५ कोटी गुंतवणुकीचे उद्दिष्टे साध्य झाले आहे असून प्रत्यक्ष रोजगार निर्मिती ७८३४८ इतके साध्य झाले आहे.

वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंतर्गत साध्य झालेले उद्दिष्टये विचारात घेवूनच एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण

२०२३-२८ चे वास्तविक साध्य होवू शकेल असे उद्दिष्टये ठरविण्यात आले आहेत.

---

## राज्य ग्राहक आयोगाकडील प्रलंबित तक्रारी व रिक्त पदांबाबत

**(२१) ६५६३५ (३०-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अनिल देशमुख (काटोल) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ नुसार ग्राहकांच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी राज्य स्तरावर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हास्तरावर ४० जिल्हा ग्राहक आयोग कार्यान्वित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील ग्राहकांच्या ७० हजार तक्रारी आयोगांसमोर प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य ग्राहक आयोगासह राज्यातील विविध जिल्हा ग्राहक आयोगांतील सुमारे १९८ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील रिक्त पदे भरुन राज्य तसेच जिल्हा ग्राहक आयोगांसमोरील प्रलंबित तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (११-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अंतर्गत राज्यातील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचेकरीता एकुण १३२ अध्यक्ष व सदस्य यांची पदे मंजूर आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने सी.ए. क्र.८३१/२०२३ मध्ये दि.३.३.२०२३ रोजी अनुच्छेद १४२ अंतर्गत दिलेल्या निर्देशानुसार पदभरती प्रक्रिया राबवून प्राधान्याने तीन महिन्याच्या आत पदभरती करणेबाबत एम.ए. क्र.३९७/२०२३ मध्ये दि.२४.३.२०२३ रोजी निर्देश दिले आहेत. सदर निदेशानुसार राज्यातील राज्य ग्राहक आयोगातील सदस्य व जिल्हा ग्राहक आयोगातील अध्यक्ष व सदस्य अशा ११२ रिक्त पदांकरिता पदभरतीसाठी प्रक्रिया राबविण्यात आली असून सद्य:स्थितीत कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

राज्यातील ग्राहक आयोगासाठी शासन निर्णय दि.१८.४.२०२२ नुसार एकुण ३९९ कर्मचारी आकृतीबंधास मान्यता प्राप्त आहे. या पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीने पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील ५९ पदे सरळसेवेने भरणेकरीता कार्यवाही प्रस्तावित आहे. गट ड वर्गाची पदे बाह्यस्त्रोत यंत्रणेद्वारे भरण्यात येतात.

---

## 'एनआयआरएफ' (नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क) मध्ये राज्यातील शैक्षणिक संस्थांची घसरण झाल्याबाबत

**(२२) ६५६५९ (२८-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने देशभरातील शैक्षणिक संस्थाचे एनआयआरएफ (नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क) रँकिंग जाहीर केले असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एनआयआरएफ मध्ये सन २०२३ मध्ये देशातील पहिल्या १०० शिक्षण संस्थांमध्ये केवळ ११ संस्था असून राज्यातील शैक्षणिक संस्थांची मोठ्या प्रमाणात घसरण झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०३-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत खरे आहे.
(३) या विभागाच्या अखत्यारितील राज्यातील संस्थांची गुणवत्ता वाढविण्याच्या अनुषंगाने मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०८ व ०९ जून, २०२३ रोजी कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे यांच्यासह बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये एनआयआरएफ रॅंकिंगमध्ये सुधारणा होण्यासाठी कमतरता असलेल्या बाबींवर तसेच संशोधन विषयांवर अधिकाधिक भर देऊन गुणात्मक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करावा, याबाबत व्यावसायिक संस्थेचा सल्ला घेण्याचा विद्यापीठांनी विचार करावा, विद्यापीठ स्तरावर समितीची स्थापना करण्यात यावी, IQAC च्या सहकार्यान्वये कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात यावा असे निदेश मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांनी दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशी, नवी मुंबईतील सिडकोच्या जागेवर महाराष्ट्र भवनाचे बांधकाम करण्याबाबत

**(२३) ६५८२१ (३०-०८-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :**सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ३.३.२०२० रोजीच्या बैठकीत, नवी मुंबई, वाशी येथील सेक्टर ३०-ए मधील शहर व औद्याेगिक विकास महामंडळाच्या (सिडको) मालकीच्या भूखंड क्र. ११ ते १४, एकूण ८३०.९१ चौ.मी.इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड महाराष्ट्र भवन तथा विश्रामगृहाच्या बांधकाम व व्यवस्थापनाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्यात येत असल्याचा निर्णय घेतल्याबाबत सिडकोने दिनांक ५.३.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी दिनांक ११ मार्च २०२२ रोजीच्या अर्थसंकल्पीय भाषणात नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारण्यात येऊन त्यासाठी रु. १०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सिडको प्राधिकरणाकडे लिझ प्रिमियमपोटी रु. ३१.५० कोटी जमा करण्यात आले असून सदर भूखंडाचे सविस्तर सर्वेक्षण करुन मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्यामार्फत रेखांकन आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महाराष्ट्र भवनाचे बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२३) :** (१) सिडको संचालक मंडळाच्या दि.३.३.२०२० रोजीच्या बैठकीत, नवी मुंबई,

वाशी येथील सेक्टर ३०-अ मधील शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या (सिडको) मालकीच्या भूखंड क्र. ११ ते १४, एकूण ८३२२.९१ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड महाराष्ट्र भवन तथा विश्रामगृहाच्या बांधकाम व व्यवस्थापनाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्यात येत असल्याचा निर्णय घेतल्याबाबत सिडकोने दि.५.३.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सिडको प्राधिकरणाकडे आजपावेतो रु. ३४.३८ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे. तसेच, सदर भूखंडाचे सविस्तर सर्वेक्षण करुन, मुख्य वास्तूशास्त्रज्ञ यांच्यामार्फत महाराष्ट्र भवनाकरिता रेखांकन आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीत आहे, तथापि, सदर इमारतीचे बांधकाम सिडको प्राधिकारणामार्फत करण्याची बाब विचाराधीन आहे.

---

**सोयंगांव तालुक्यातील (मालेगांव) दहिवाळला या रस्त्यावर रबरी गतिरोधक बसविण्याबाबत**

**(२४) ६६००५ (३०-०८-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोयंगांव तालुक्यातील (मालेगांव) दहिवाळला या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करतांना गतिरोधक बसविण्यात आला नसल्याने या रस्त्यावरील अपघातांच्या संख्येत वाढ झाल्याचे नुकतेच माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांवर रबरी गतिरोधक बसविण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर रस्त्यावर रबरी गतिरोधक बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-१०-२०२३) :** (१) अशी नोंद नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर रस्त्यावर रबरी गतिरोधक बसविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे (aicte) विभागीय कार्यालय बंद असल्याबाबत**

**(२५) ६६०३० (०१-०९-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे (aicte) विभागीय कार्यालय माहे मे, २०२३ मध्ये वा दरम्यान बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालयाचे अन्यत्र स्थलांतर झाल्यामुळे महाराष्ट्रातील तंत्र शिक्षण संस्था आणि शिक्षकांना विविध कामांसाठी दिल्ली येथे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील कार्यालय पूर्ववत सुरू करण्यासाठी विविध संघटनानी शासनाकडे निवेदनाद्वारे वेळोवेळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील कार्यालय पुन्हा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१३-१०-२०२३) :** (१) होय.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर परिषदेने दि.२७.०२.२०२३ रोजीच्या सुचनेद्वारे मुंबई येथील पश्चिम क्षेत्रीय विभागीय कार्यालय, नवी दिल्ली येथे स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

(२), (३) व (४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या पश्चिम क्षेत्रीय विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित घटकांची (All Stake Holders) गैरसोय होऊ नये म्हणून पवई, मुंबई येथील पश्चिम क्षेत्रीय विभागीय कार्यालय दिल्ली येथे हलविण्यात येऊ नये, अशी विनंती तंत्रशिक्षण संचालनालयाने दि.१४ फेब्रुवारी, २०२३ च्या पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना केली होती. सदर विनंतीस अनुसरून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दि.०६.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, संस्थांच्या अर्जांची सर्व प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे प्रादेशिक कार्यालये दिल्लीला स्थलांतरीत केल्याने त्याचा एआयसीटीईच्या कामकाजावर परिणाम होणार नाही. तसेच सर्व संबंधित घटकांच्या समस्यांचे योग्य प्रकारे निराकरण ऑनलाईन पध्दतीने केले जाईल. त्यांच्या समस्या वेळेत सोडविल्या जातील. देशातील प्रशासन अधिक पारदर्शक बनवून भारताला डिजीटली सशक्त आणि ज्ञान-आधारीत अर्थव्यवस्थेत बदल करण्याच्या दृष्टिकोनातून भारत सरकारच्या डिजीटल इंडिया कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्याअंतर्गत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी सर्व संबंधित घटकांशी समन्वय करण्यासाठी बहुतांश प्रक्रीया ऑनलाईन पध्दतीने केल्या गेल्याने प्रादेशिक कार्यालय स्थलांतरीत करण्यात आले असल्याचे पत्रात नमूद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रलंबित कामांच्या देयकांबाबत

**(२६) ६६१७० (३१-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी पर्यंत सुमारे ४५० कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही कामे सुरु असताना कंत्राटदारांनी केलेल्या कामांची ३०० कोटी रुपयांची देयके थकीत असल्याने कंत्राटदारांनी नवीन कामांवर बहिष्कार टाकला आहे, हे ही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच प्रलंबित कामांची थकीत देयके अदा करणे व नवीन कामांच्या निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सा. बां. विभागामार्फत, योजनेकरिता विहित मार्गाने अर्थसंकल्पीत झालेल्या निधीपैकी, वित्त विभागाने वितरणाकरिता उपलब्ध करून दिलेला निधी, संबंधित जिल्ह्यांच्या अर्थसंकल्पीय तरतूदीच्या प्रमाणात प्रमाणशीर

पध्दतीने वितरीत केला जातो. कंत्राटदारांनी निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविला आहे. तसेच प्रलंबित निविदा पूर्ण

करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नरिमन पॉईंट, मुंबई येथील एअर इंडिया इमारत, खरेदी करण्याबाबत**

**(२७) ६६२२२ (३०-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नरिमन पॉईंट, मुंबई येथील एअर इंडिया इमारत, राज्य शासन खरेदी करणार असून तसा प्रस्ताव नागरीक विमान सेवा विभाग यांच्याकडे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान पाठविण्यात आला असून केंद्र शासनाच्या नागरी विमान सेवा विभागाने या प्रस्तावास सध्या मंजूरी दिली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारत खरेदी करण्याच्या प्रस्तावास परवानगी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३०-१०-२०२३) :** (१), (२) व (३)

एअर इंडिया इमारत, नरिमन पॉईंट, मुंबई येथील इमारत खरेदीचा प्रस्ताव राज्य शासनामार्फत विचाराधीन असून दि.०९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये रु. १६०१/- कोटीचा देकार केंद्र शासनाच्या नागरी सेवा विभागास सादर केला असून त्यानुषंगाने नागरी विमान सेवा विभागाने काही बाबीबाबत माहिती मागितली असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**करडखेल, मरखेल, हाणेगाव, औराद, सरमेलगत (ता.देगलूर,जि.नांदेड) येथील रस्त्यांचे झालेली दूरवस्था**

**(२८) ६६३५९ (३१-०८-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करडखेल, मरखेल, हाणेगाव, औराद, सरमेलगत (ता.देगलूर,जि.नांदेड) येथील रस्त्यांची गत दोन वर्षांपूर्वी कोटयवधी रुपये खर्च करुन करण्यात आलेली रस्त्यांची कामे ठेकेदारांनी निकृष्ठ दर्जाची केल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे रस्त्यांवर अपघाताच्या प्रमाणात वाढ होऊन नागरिकांचा जीव धोक्यात आल्याने संबंधित ठेकेदारांची चौकशी करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित ठेकेदारांवर कारवाई करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडगांव ते कोतवाल (ता.खेड, जि.रत्नागिरी) या गावांना जोडणारा रस्ता जिल्हा जोड रस्ता करण्याबाबत**

**(२९) ६६४२४ (३१-०८-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगांव ते कोतवाल (ता.खेड, जि.रत्नागिरी) गावांना जोडणारा जिल्हा जोड रस्ता करण्याची मागणी ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत श्री. लक्ष्मणराव मोरे हे मागील तीन वर्षांपासून सातत्याने सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी/रायगड, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण जिल्हाधिकारी, रत्नागिरी आदींकडे लेखी निवेदनाद्वारे करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडगाव ते कोतवाल हा जिल्हा जोड रस्ता झाल्यास रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुका व रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुका जोडले जाऊन दोन्ही बाजूच्या दुर्गम भागातील असंख्य गावांना या रस्त्याचा फायदा होणार असून येथील प्रेक्षणीय स्थळांचा पर्यटनदृष्ट्या विकास होऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचा सर्व्हे करून पाणी अहवाल सादर करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांना देण्यात आलेले आहेत तसेच जिल्हधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून अनेक स्मरणपत्रे सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांना पाठविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग चिपळूण यांनी दखल घेतली नसल्याने जनतेत असंतोष निर्माण झाला असून दिनांक १ मे, २०२३ रोजी (महाराष्ट्र दिनी ) खेड तालुक्यातील नागरिकांच्या उपस्थितीत महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच, रत्नागिरी या संघटनेच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष, श्री.रामचंद्र बाबू आखाडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण आंदोलन करण्याचा इशारा माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन वडगाव ते कोतवाल या जिल्हा जोड रस्त्याच्या कामास विनाविलंब मंजुरी देऊन सदर काम सुरु करुन रस्ता वाहतुकीसाठी कार्यान्वीत होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१६-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, हे खरे आहे

(३) होय, हे खरे आहे.

(४) निवेदन प्राप्त नाही

(५) वडगांव ते कोतवाल या आखणीची सर्वसाधारण लांबी १५ कि.मी. असून यापैकी खेड तालुक्यात ११.०० किमी व पोलादपूर तालुक्यात ४ कि.मी. लांबी आहे. रस्त्याचे एकूण १५.०० किमी लांबीपैकी अंदाजे ४.०० किमी लांबी वनक्षेत्रातून जाते. सदर आखणीकरीता सर्वेक्षण करणे, भूसंपादन करणे व सर्व आवश्यक परवानग्या प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुका व रायगड जिल्हयातील पोलादपूर तालुका जोडणारा कुडोशी मांडवे दहिवली घोगरे ओमळी रस्ता वाहतूकीकरीता उपलब्ध आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरुड तालुक्यातील (जि. रायगड) विश्रामगृहाच्या दुरवस्थेबाबत**

**(३०) ६६९३६ (३१-०८-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीच्या कळात दिनांक २२ मार्च २०२० रोजी पासून मुरुड येथील शासकीय विश्राम गृह ताब्यात घेऊन या ठिकाणी कोव्हिड केंद्र सुरु करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विश्राम गृहाच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झाली असल्याने मुरुड जंजिरा येथे येणारे शासकीय अधिकारी/कर्मचारी, पर्यटक यांच्या निवासाची गैरसोय होत असल्याने मुरुड येथील विश्रामगृहाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाकडे ३ वेळा उच्चस्तरावर सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय विश्रामगृहात सुरु करण्यात आलेल्या कोविड केंद्राचा ताबा अद्यापही तालुका आरोग्य अधिकारी, मुरुड यांचेकडे असल्याने तहसीलदार, मुरुड जंजिरा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये तालुका आरोग्य अधिकारी यांना विश्रामगृहातील साहित्य ताब्यात घेऊन, विश्रामगृहाचा ताबा त्वरित सार्वजनिक बांधकाम विभागास देण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदर विश्रामगृहाचा ताबा घेऊन तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) अंशत: खरे आहे,

मुरुड येथील विश्रामगृहाच्या दुरुस्ती व नुतनीकरणचा रु. १२० लक्ष किंमतीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, रायगड यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेकरिता सादर करण्यात आला आहे.

(३) होय, हे खरे आहे,

(४) तालुका आरोग्य अधिकारी यांनी दिनांक २७.०७.२०२३ च्या पत्रान्वये शासकीय विश्रामगृह, मुरुड चा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागास दिला आहे. तथापि, जिल्हा नियोजन समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर तात्काळ काम हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## रावेर (जि. जळगाव) येथील बराणपुर रोडवरील चौधरी ट्रेडर्स व इतर गोदामात धान्याचा काळा बाजार होत असल्याबाबत

**(३१) ६७०१० (३०-०८-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि. जळगाव) येथील रेशनच्या काळाबाजाराचे धान्य असल्याचा संशयावरून जिल्हाधिकारी, जळगाव यांनी बराणपुर रोडवरील चौधरी ट्रेडर्स चे गोदाम दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास सील केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोदामामध्ये काळ्या बाजारातील मोठया प्रमाणात तांदूळ व रेशनचे रिकामे बारदान आढळून आले असून यापूर्वी सुद्धा अन्नधान्याच्या काळाबाजारासंदर्भात चौधरी ट्रेडर्स या गोदामावर अधिकारी व पोलिसांनी कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ नुसार केलेल्या कारवाईत सदर गोदामांमध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, रावेर यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२७-१०-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.
(३) रावेर बऱ्हाणपूर रोडवरील चौधरी ट्रेडर्स या खाजगी गोदामांमध्ये गहू-९७ कट्टे, तांदूळ-२०८ कट्टे, ज्वारी-११ कट्टे, व मका-१८० कट्टे व बालाजी काटयाजवळील मो.रेहान शे.नईम या खाजगी गोदामामध्ये गहू-०८ कट्टे, व तांदूळ-१७ कट्टे आढळून आले आहे. सदरचे धान्य सिलबंद करण्यात आले आहे. तसेच, रावेर येथील सावदा रोडवरील जी.एस.कॉलनी भागातील खाजगी गोदामामध्ये १७२५० रिक्त बारदाना आढळून आला आहे.

रावेर शहरातील तीन खाजगी गोदाम पंचासमक्ष सिलबंद करुन संबंधीत गोदाम मालकांविरुध्द जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ कलम ३ व ७ प्रमाणे रावेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बहिरवली (ता. खेड, जि.रत्नागिरी) ते मौजे करंबवणे (ता. चिपळूण, जि.रत्नागिरी) यादरम्यानच्या खाडीपुलाच्या कामास होत असलेला विलंब

**(३२) ६७१९४ (३०-०८-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण व खेड, (जि.रत्नागिरी) या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या मौजे बहिरवली (ता.खेड) ते मौजे करंबवणे (ता.चिपळूण) यादरम्यानच्या खाडीवरील पूल बांधकामास सन २०१७-२०१८ मध्ये शासनाने मंजुरी देऊन आर्थिक तरतूद देखील केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी खाजगी तज्ञ सल्लागारांची नेमणूक करण्यात आली असून आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करून घेण्याची कार्यवाही प्रगतीत असल्याचे गत दोन वर्षांपासून शासनाकडून कळविण्यात आले असले तरी प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी खाजगी तज्ञ सल्लागाराची नेमणूकीबाबतची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन दि.०६/०२/२०२३ रोजी या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सद्य:स्थितीत आवश्यक त्या परवानग्या घेण्याचे काम प्रगतीत आहे. विविध विभागांकडून लागणाऱ्या परवानग्यांकरिता किमान ८ ते १० महिने इतका कालावधी अपेक्षीत आहे. परवानग्या प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष पुलाचे अंदाजपत्रक तयार करणे, तसेच सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता व निविदा निश्चिती करुन प्रत्यक्ष काम सुरु करण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नवीन शैक्षणिक वर्षात शेकडो संस्थांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाने इरादा पत्र दिल्याबाबत

**(३३) ६७६९३ (३१-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवीन शैक्षणिक वर्षात शेकडो संस्थांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाने इरादा पत्र दिल्याने किमान शंभरहुन कायम विना अनुदान तत्त्वावर नवीन महाविद्यालय सुरू होणार असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इरादा पत्र देताना शासनाने कोणताही बृहत आराखडा तयार न करता नवीन महाविद्यालये निर्माण केल्यास सदर महाविद्यालयात प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा होऊन तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपासमार होणार नाही यासाठी शासनाने त्यांना देण्यात येणारे वेतन आणि इतर सेवा सुविधा व विद्यार्थ्यांना देय

असणाऱ्या सर्व सवलती या महाविद्यालयातून देण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१३-१०-२०२३) :** (१) शासन आदेश, दि.०१.०४.२०२३ अन्वये सन २०२३-२४ या वर्षाकरिता १२१ नवीन महाविद्यालयांना इरादापत्र मंजूर करण्यात आले आहे.
(२) व (३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ७६ मधील तरतुदीस अनुसरुन सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी अकृषी विद्यापीठांतर्गत नवीन महाविद्यालये/परिसंस्था सुरु करण्यासाठी स्थळ बिंदू निश्चितीबाबत बृहत आराखडा तयार केलेला आहे. सदर बृहत आराखड्यानुसार विद्यापीठांकडून शिफारशीसह प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी पात्र ठरलेल्या महाविद्यालयांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार "कायम विना अनुदान" तत्वावर इरादापत्र देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला-अकोट (जि.अकोला) रा.मा. २०४ वरील गांधीग्राम/गोपालखेड येथील पूर्णा नदीवरील पुलाच्या प्रलंबित बांधकामाबाबत

**(३४) ६७७०२ (३१-०८-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला-अकोट (जि.अकोला) रा.मा. २०४ वरील गांधीग्राम/गोपालखेड गावाजवळील पूर्णा नदीवरील पुलाच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१५ रोजी कार्यारंभ आदेश दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने (दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ पर्यंत) निश्चित केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाच्या पोच मार्गावरील लहान पूल स्लॅब ड्रेन (SLAB DRAIN) इत्यादीचे बांधकाम संपादीत केलेल्या जागेवर व संरेखनानुसार करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर स्लॅब ड्रेन (SLAB DRAIN) लहान पूल चुकीच्या ठिकाणी बांधण्यात आल्यामुळे सदर मार्गासाठी भूसंपादन बदलण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या या चुकांमुळे पुलाचे बांधकाम अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करुन पुलाचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-१०-२०२३) :**(१) सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि.०६-०२-२०१५ रोजी देण्यात आला आहे.
(२) सदर काम पूर्ण करणे करिता कालावधी दि. ०५-०२-२०१५ पासून २४ महिने म्हणजेच दि. ०४-०२-२०१७ पर्यत होता.
(३) हे खरे नाही.
लहान पुल व स्लॅब ड्रेनचे काम हे मंजूर संरेखानुसार व संपादित केलेल्या जागेवर करण्यात आलेले आहे.
(४) हे खरे नाही.
लहान पुल व स्लॅब ड्रेन चे काम हे मंजूर संरेखानुसार संपादित केलेल्या जागेवरच करण्यात आले आहे.
भूसंपादन सुधारणा करण्याची आवश्यकता ही मंजुर संरेखनेत व मोजणी नकाशा यातील तफावत तसेच काही गट

क्रमांक.वगळणे अथवा क्षेत्रफळ कमी /जास्त होणे यामुळे झालेले आहेत. यामुळे पुल/पुलमो-या यांच्या ठिकाणात कोणताही बदल झालेला नाही.

(५) हे खरे नाही.

पुलाचे काम जवळपास पूर्ण झालेले असून सद्य:स्थितीत  तात्पुरत्या स्वरुपात वाहतूक सुरु करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

(७) भूसंपादनाची प्रक्रीया पूर्ण करुन मार्च २०२४ पर्यत कामे पूर्ण करणेचे नियोजन आहे.

---

**केंद्र शासनाच्या राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीत झालेल्या दिरंगाईबाबत**

**(३५) ६८१५९ (०१-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाची अंमलबजावणीस राज्य शासनाने दिरंगाई करून `राज्य उच्च व तंत्र शिक्षण परिषद' स्थापन करण्यास ३ वर्षांपेक्षा अधिक कालावधी लावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उच्च शिक्षणावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या २ टक्के खर्च करावा अशी अट असताना केवळ ०.३२ टक्के इतकाच खर्च केल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २०२१  रोजीच्या अनुपालन अहवालातून  निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च स्तर शिक्षा अभियानासाठी निवडलेल्या २४ संस्थांवरील शासनाचे संनियंत्रण नसल्याने तसेच या संस्थांमधून शिक्षक कर्मचाऱ्यांची ४० टक्क्यांपेक्षा जास्त पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, `मुंबई विद्यापीठ' व `निर्मला निकेतन' या सारख्या मान्यवर संस्थांनी  शिक्षक कर्मचाऱ्यांच्या पदांबाबत `भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक' यांना माहिती न देणे व राज्य शासनाने योग्य स्पष्टीकरण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ५६ नुसार राज्यात महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद अस्तित्वात होती. तथापि, शासननिर्णय दि.२०.०५.२०१५ अन्वये राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली. त्यामध्ये राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या राज्यस्तरीय संरचनेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार शासननिर्णय दि.२३.१२.२०१६ अन्वये रुसा अंतर्गत राज्य उच्च शिक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ राज्यात लागू करताना त्यामध्ये कलम ७८ अन्वये महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय उच्चतर शिक्षा परिषदेची तरतूद करण्यात आली व त्यानुसार शासन अधिसूचना दि.२१.०८.२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय उच्चतर शिक्षा परिषद अधिसूचित करण्यात आली.

(२), (३) (४) व (५) हे खरे आहे.

राज्यातील उच्च शिक्षणावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या २ टक्के खर्च करावा अशी अट असताना केवळ ०.३२ टक्के इतकाच खर्च केल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या अनुपालन अहवालातून  निदर्शनास आले असले तरी, अहवालातील खर्चात केवळ या विभागाकडून  उच्च शिक्षणावर केलेल्या खर्चाचा समावेश होता. तथापि, राज्यातील उच्च शिक्षण विभागाच्या कक्षेतील खाजगी महाविद्यालये आणि उच्च शिक्षण संस्थांकडून तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्याक विभाग,

क्रीडा विभाग, कृषी विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग यांच्याकडून उच्च शिक्षणावर केलेला खर्चाचा त्यात समावेश नव्हता. त्यामुळे राज्याचा उच्च शिक्षणावरील खर्चाची टक्केवारी कमी प्रमाणात निदर्शनास आली आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या अनुपालन अहवालात उच्च स्तर शिक्षा अभियानासाठी निवडलेल्या २४ संस्थांपैकी २१ संस्थांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार २२ ते ७७ टक्के शिक्षक मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले असून ‘मुंबई विद्यापीठ’ व ‘निर्मला निकेतन’ या संस्थांनी रिक्त पदांची माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. तसेच, शिक्षकांच्या नियुक्तीसाठी संस्थांनी सादर केलेले प्रस्तावांना विभागाने प्रतिसाद दिला नाही असेही आक्षेप घेण्यात आले आहेत. या मुद्यांच्या अनुषंगाने वस्तुस्थितिदर्शक स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापरिक्षक कार्यालयास देण्यात आलेली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडचिरोली जिल्हयातील नवीन शिधापत्रिकाधारकांना धान्य उपलब्ध करून देण्याबाबत

**(३६) ६८३४४ (३०-०८-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील धान्य पुरवठा इष्टांकात वाढ करण्यात आलेली नसल्याने नवीन शिधापत्रिका धारक नागरीकांना मागील २ वर्षापासून रास्त भाव दुकानातुन धान्य मिळत नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील धान्य पुरवठयाच्या इष्टांकात वाढ करुन नवीन शिधापत्रिकाधारकांना धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती व तपशिल देण्यात यावा,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१०-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय दि. ०४.०९.२०२३ नुसार गडचिरोली साठी अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत (AAY) साठी १,०२,४९२ व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी (PHH) ४,७४,५९३ इतका इष्टांक देण्यात आला आहे. त्यापैकी अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत (AAY) १,०१,३६४ व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी (PHH) ४,४८,३७४ इतक्या पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यांना नियमित धान्य वाटप करण्यात येत आहे. तसेच ९९.९८ % शिधापत्रिकांचे आधार सिडींग पुर्ण झाले असून उर्वरीत शिधापत्रिकांचे आधार सिडींगचे काम सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील प्राध्यापक भरतीसाठी १०९ महाविद्यालयांनी ५३२ ना- हरकत प्रमाणपत्रासाठीचे मागणी प्रस्ताव सादर ल केल्याबाबत

**(३७) ६८८८२ (०१-०९-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राध्यापक भरतीसाठी १०९ महाविद्यालयांनी ५३२ पदांच्या भरतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा मागणी प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालयाकडे सादर केला नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयांनी ऑनलाइन प्रस्ताव सादर न केल्यास ती पदे अन्य महाविद्यालयांना वर्ग करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२५-१०-२०२३) :** (१) राज्यातील पद भरतीसाठी मान्यता दिलेल्या ९४ महाविद्यालयांनी ना हरकत प्रमाणपत्रसाठीचे प्रस्ताव सादर केले नसल्याची बाब निर्दशनास आली, हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग दिनांक २४ जुलै २०२३ अन्वये राज्यामध्ये नविन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी व ज्या महाविद्यालयांनी संधी देऊनही पदभरतीबाबत दाखविलेली अनास्था विचारात घेऊन ना हरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांची सहायक प्राध्यापक संवर्गातील पदे ज्या महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा प्राप्त आहे, अशा ६६ महाविद्यालयांना वाटप करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ग्राहक न्याय मंचाची यंत्रणा ठप्प झाल्याबाबत**

**(३८) ६८९९३ (३०-०८-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्राहक न्याय मंचाकडे सुमारे ७० हजार तक्रारी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ३१ जिल्ह्यातील ग्राहक न्याय मंचांना अध्यक्षच नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने शासनाला त्वरित सर्व रिक्त जागा भरण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (११-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अंतर्गत राज्यातील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचेकरीता एकुण १३२ अध्यक्ष व सदस्य यांची पदे मंजूर आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने सी.ए. क्र.८३१/२०२३ मध्ये दि.३.३.२०२३ रोजी अनुच्छेद १४२ अंतर्गत दिलेल्या निर्देशानुसार पदभरती प्रक्रिया राबवून प्राधान्याने तीन महिन्याच्या आत पदभरती करणेबाबत एम.ए. क्र.३९७/२०२३ मध्ये दि.२४.३.२०२३ रोजी निर्देश दिले आहेत. सदर निदेशानुसार राज्यातील राज्य ग्राहक आयोगातील सदस्य व जिल्हा ग्राहक आयोगातील अध्यक्ष व सदस्य अशा ११२ रिक्त पदांकरिता पदभरतीसाठी प्रक्रिया राबविण्यात आली असून सद्य:स्थितीत कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

---

**खंडाळा (ता.सातारा), येथील अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, वाडवडी येथील मुलींच्या वसतिगृहात सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३९) ६९१२६ (०१-०९-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खंडाळा (जि.सातारा) येथील अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, वाडवडी येथील मुलींच्या वसतिगृहातील शौचालय व स्नानगृह येथे पाण्याची व्यवस्था नसल्याने तेथे घाणीचे साम्राज्य पसरले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर महाविद्यालयात पंख्यांचीही सोय नसल्याने याबाबत मुलींनी पंखे नसल्याची तक्रार केली असता

संस्थाचालकांनी विद्यार्थिनींना स्वखर्चाने पंखे बसवून वीज बिल भरण्याची सक्ती करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाविद्यालयातील शैक्षणिक वर्षात वार्षिक स्नेहसंमेलन, विविध स्पर्धा, शैक्षणिक प्रदर्शने इत्यादी उपक्रम राबवली जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्यार्थ्यांना मुलभूत सोयी सुविधा न पुरविणाऱ्या संस्थेविरुध्द कारवाई करुन विद्यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२५-१०-२०२३) :** (१) नाही.
(२) सदर महाविद्यालयातील वसतीगृहामध्ये पंखे उपलब्ध नाहीत. तथापि, स्वखर्चाने पंखे बसवून वीज बिल भरण्याबाबत विद्यार्थ्यांना सक्ती करण्यात आलेली नाही, असे तंत्र शिक्षण संचालनालयाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या निदर्शनास आले आहे.
(३) नाही.
(४) प्रस्तुत प्रकरणी तंत्र शिक्षण संचालनालयाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या शिफारशीनुसार विद्यार्थिनींच्या वसतीगृहात पंखे बसविणे तसेच, स्वच्छतागृहांची डागडुजी करण्याबाबत संस्थेस आवश्यक सूचना देण्यात आल्या असून त्यानुसार संस्थेकडून कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महाविद्यालयातील सुमारे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(४०) ६९२२८ (०१-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाविद्यालयातील सुमारे ४० हजार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, मा. मुख्यमंत्री, कुलगुरु व संचालक, उच्च व तंत्र शिक्षण यांच्याकडे दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ व ०३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-११-२०२३) :** (१) व (२) राज्यातील अकृषि विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध मागण्यांसदर्भात निवेदने प्राप्त झाली होती. सदर मागण्यासंदर्भात मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५ फेब्रुवारी, २०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा शासन निर्णय दि.३१ मे, २०२३ निर्गमित करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये अकृषि विद्यापीठांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी, २०१६ ते दि.३१ ऑक्टोबर, २०२० या कालावधीतील सातव्या वेतन आयोगाची थकबाकी प्रदान करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांच्या पिवळ्या शिधापत्रिकांबाबत

**(४१) ६९४४० (३०-०८-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांच्या पिवळ्या शिधापत्रिका विभक्त करताना नव्याने बनविल्या जाणाऱ्या शिधापत्रिकांचा मूळ दर्जा कायम ठेवण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री यांच्याकडे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यात केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांच्या पिवळ्या शिधापत्रिका विभक्त करताना नव्याने बनविल्या जाणाऱ्या शिधापत्रिकांचा मूळ दर्जा कायम ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१०-११-२०२३) :** (१) या संदर्भात मा. पालकमंत्री (पालघर) महोदयांकडे माहे जून, २०२३ मध्ये निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) पिवळ्या शिधापत्रिकेमधून विभक्त केलेल्या शिधापत्रिकेस उत्पन्नानुसार इष्टांकाच्या मर्यादेत अनुज्ञेय योजनेचा लाभ देण्यात येतो. शासन निर्णय दि. ४.०९.२०२३ अन्वये पालघर जिल्ह्यास अंतोदय अन्न योजना (AAY) व प्राधान्य कुटुंब योजना (PHH) लाभार्थ्यांचा अतिरिक्त इष्टांक उपलब्ध करण्यात आला असून, सदर वाढीव इष्टांक आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांना तालुकानिहाय वितरित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे डिजिलॉकरमध्ये उपलब्ध करुन देणेबाबत**

**(४२) ६९६२६ (०१-०९-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे डिजिलॉकरमध्ये उपलब्ध करुन देण्याची सूचना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विद्यार्थी लॉग इन करुन एका क्लिकवर ते डिजिटल प्रमाणपत्र कुठेही आणि कधीही डाऊनलोड करु शकतील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या सूचनेवर निर्णय घेवून त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार सदर कार्यक्रमाचा आवाका वाढविण्यासाठी राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांना डिजी लॉकर पोर्टलवर विद्यार्थ्यांशी संबंधित मागील दहा वर्षांचा विदा (Data) अपलोड करण्याबाबत दि.२३.११.२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच, तांत्रिक मदतीसाठी राज्य समन्वयकामार्फत वेळोवेळी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यातील रस्ते व पुलांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४३) ६९८६५ (३१-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यातील रस्ते व पुलांची मोठया प्रमाणावर दुरवस्था झाल्यामुळे नागरिक व शाळकरी मुलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे जिल्ह्यात नादुरुस्त रस्ते व पुलांचा सव्हे‍ॅ करून तातडीने सदर रस्ते व पूलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-१०-२०२३) :** (१) व (२) धुळे जिल्हयातील प्रमुख राज्य मार्ग, व प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या नियमित वार्षिक देखभाल दुरुस्ती करीता मंजूर कार्यक्रमाप्रमाणे रस्त्यांची देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यात येत आहेत. पूल दुरुस्तीची कामे निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठात कॉम्प्युटर टेक्नोलॉजीच्या पेपरमध्ये अभ्यासक्रमा बाहेरील प्रश्न विचारण्यात आल्याबाबत**

**(४४) ६९९७८ (०१-०९-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठात कॉम्प्युटर टेक्नोलॉजीच्या अंतिम सेमिस्टरच्या पेपरमध्ये अभ्यासक्रमाबाहेरील ८० टक्के प्रश्न विचारण्यात आल्याचे दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत रामटेकच्या किट्स इंजिनीअरिंग महाविद्यालयाच्या सुमारे १५० विद्यार्थ्यांनी प्राचार्यांकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाविद्यालयाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
कॉम्प्युटर टेक्नोलॉजीच्या अंतिम सेमिस्टरच्या पेपरमध्ये अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न विचारण्यात आल्याबाबत रामटेकच्या किट्स इंजिनीअरिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडे तक्रारी केल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने विद्यापीठामार्फत संबंधित विषयाच्या अभ्यासमंडळाची बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत विद्यार्थ्यांनी घेतलेले आक्षेप निरस्त करण्यात आले होते. सदर परीक्षेचा निकाल दि.३०.०६.२०२३ रोजी घोषित केला असून त्यावर संबंधित विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतलेले नाहीत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिवराबाजार-देवलापार (ता.रामटेक, जि.नागपूर) रस्त्यावरील गतीरोधकांबाबत**

**(४५) ६९९८४ (३१-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवराबाजार-देवलापार (ता.रामटेक, जि.नागपूर) या अवघ्या ६ कि.मी. मार्गावर तब्बल २८ गतिरोधक घालण्यात आल्याने गरोदर महिला आणि रुग्णांना अत्यंत त्रासदायक व जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याची गंभीर बाब दिनांक २२ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यावरील गतीरोधकांच्या ठिकाणी पांढरे पट्टे यांसह इतर सुरक्षात्मक उपाययोजनांचा अभाव असल्याने अपघात होवून जिवित व मालमत्तेची हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर मार्गावरील प्रवास सुरक्षित होण्यासाठी तातडीने कोणत्या ठोस उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही,

(२) व (३) हे खरे नाही.

अस्तित्वातील गतीरोधकावर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**नामांकित कंपन्यांच्या नावाने बनावट सौंदर्यप्रसाधनांची निर्मिती करण्यात येत असल्याबाबत**

**(४६) ७०१३१ (३१-०८-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नामांकित कंपन्यांच्या नावाने बनावट पावडर, क्रिम तसेच सौंदर्य प्रसाधने तयार करुन खुल्या बाजारात पुरवठा करण्यात येत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नालासोपारा, वसईतील गोदाम व दोन सौंदर्यप्रसाधनांची निर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर पोलीसांच्या पथकाने छापा टाकून विविध नामांकित कंपन्यांची बनावट उत्पादने व ती बनविण्यासाठी वापरण्यात येणारी मशीन व कच्चा माल जप्त करुन कारखाना मालकास अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१२-१०-२०२३) :**(१), (२) व (३) खरे आहे

दि.१०.०६.२०२३ रोजीच्या दैनिक वर्तमानपत्रात बनावट सौंदर्य प्रसाधनांचा साठा मुंबई पोलिसांनी जप्त केला अशा आशयाची बातमी प्रसारीत झाली होती.

सदर प्रकरणी माहिम गुन्हे शाखा पोलिस पथकांने नालासोपारा व कामण (वसई पश्चिम) येथील गोदामावर व २ सौंदर्य प्रसाधनाची निर्मिती करणा-या कारखान्यांवर छापा टाकून नामवंत कंपन्यांची बनावट उत्पादने, उत्पादन मशिनरी व कच्चा माल असाणारा एकूण रु.१,४१,७४,८१५/- किंमतीचा मुद्येमाल जप्त केला आहे. तसेच या प्रकरणी माहिम पोलीस स्टेशन, मुंबई येथे प्रथम खबर अहवाल दि.०८.०६.२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सौदर्यं प्रसाधनांच्या उत्पादनांचे औषधे व सौदर्यं प्रसाधने कायदा, १०४० या कायदयाअंतर्गत नियंत्रण केले जात असल्याने औषध निरीक्षक समवेत संयुक्तीक तपासणी करण्यासाठी पोलिस निरीक्षक, पालघर यांना दि.०७.०७.२०२३ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. तसेच पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांना दि.१०.०७.२०२३ च्या पत्रान्वये सौदर्यं प्रसाधनाच्या साठयातून चाचणी व विश्लेषणाकरीता नमुने घेण्यास विनंती करण्यात आली आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: पुण्यात दुय्यम दर्जाची ऑनलाईन औषध विक्री होत असल्याबाबत**

**(४७) ७०१८५ (३१-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पुण्यात ऑनलाईन औषधे खरेदी करण्यात येत असून औषधे दुय्यम दर्जाची असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन औषध विक्री करु नये अशी अट औषध विक्रेत्यांवर घातली असताना ऑनलाईन औषधांची विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ठ दर्जाची औषधे ग्राहकांना विक्री करण्यात येत असल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन ऑनलाईन औषध विक्रेत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१२-१०-२०२३) :**(१) हे खरे नाही.

अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम, १९४५ मधील तरतूदीनुसार ऑनलाईन औषधांची विक्री करण्याबाबत स्वयंस्पष्ट अशी तरतूद करण्यात आलेली नाही. तथापि, केंद्र शासनाने अधिसूचना दि.२८.०८.२०१८ अन्वये Sales of Drugs E-Pharmacy (Draft Rules) मसुदा नियम प्रसिद्ध केले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) ऑनलाईन पद्दतीने औषध विक्री करताना, औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम, १९४५ मधील तरतुदीचे उल्लंघन झाल्यास, अन्न व औषध प्रशासनाकडून ऑनलाईन पद्धतीने विक्री करणाऱ्या पोर्टल्स व औषधविक्रेत्यांविरूद्ध कारवाया करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बनावट सीएमओ अधिका-याकडून पुण्यातील शिक्षण संस्थांची फसवणूक केल्याबाबत

**(४८) ७०२४७ (०१-०९-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनावट सीएओ अधिकाऱ्याकडून पुण्यातील महत्वाच्या शैक्षणिक संस्थांची फसवणूक झाल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना नामवंत महाविद्यालयात प्रवेश देतो असे सांगत त्या विद्यापीठातील अधिकाऱ्यांवर सीएमओच्या नावाने ॲडमिशन करण्यास सांगून पिंपरी चिंचवड येथील एका इसमाने अनेक विद्यार्थी, पालक व शिक्षण संस्था चालकांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (३०-१०-२०२३) :** (१) सदरहू संदर्भात संचालक, उच्च शिक्षण यांचेकडे कोणतीही

तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील राज्यमार्ग ७ चे काम अपूर्ण असल्याबाबत

**(४९) ७०४७९ (३१-०८-२०२३). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील राज्यमार्ग ७ लासलगाव, वाकी, तळेगाव, वडगाव, पंगू, रापली व मनमाड रस्ता प्रजिमा १२३ सा.क्र.७/४०० ते १४/०० व १६/०२५ ते १७/६७५ मध्ये सुधारणा तसेच वणी धोडांबे वडाळीभोई रस्ता प्रजिमा ४६ सा.क्र.११/८०० ते १६/८०० व २२/५०० ते २४/२०० मध्ये सुधारणा करुन डांबरीकरण करण्याचे काम मार्च व जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यातील १६/१०० ते १७/३०० व १२/९०० ते १३/८०० (एकरुखे फाटा जवळील लांबी) लांबी वन विभागातील हद्दित येत असल्याने सदर ३४६ व २६८ लक्ष रुपये किंमतीचे काम पूर्ण होवू शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही रस्त्यांवरील कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-१०-२०२३) :** (१) होय, हे हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे,
(३) राज्यमार्ग ७ लासलगांव, वाकी, तळेगांव ,वडगाव , रापली मनमाड प्रजिमा-१२३ या रस्त्यावर रक्कम रुपये ३४६.०० लक्ष चे डांबरीकरण व मजबूतीकरणाचे कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करून लवकरच काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
वणी, धोडांबे, वडालीभोई रस्ता प्रजिमा-४६ या रस्त्यावरील डांबरीकरण व मजबूतीकरणाचे काम प्रगतीत आहे. सदर रस्त्याच्या ९०० मी. लांबीकरीता वन विभागाची आवश्यक परवानगी प्राप्त करून लवकरच काम करणे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर येथील राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, रिसर्च ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयातील प्राचार्याचे पद भरण्याबाबत

**(५०) ७०५८२ (०१-०९-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथील सरदार पटेल मेमेरिअल सोसायटी (ट्रस्ट) द्वारा संचलित राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, रिसर्च ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयातील प्राचार्याचे पद रिक्त असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संस्थेने प्राचार्य पदाला मान्यता मिळण्यासाठी डॉ. बाबासाहेब टेक्निकल युनिर्व्हसिटी लोणेरे (डीवायटू) यांनी अद्याप प्रस्ताव पाठवलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पद भरण्याबाबत प्रस्ताव पाठवून मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे

वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२५-१०-२०२३) :**(१) होय

(२) (३) व (४)

सदर महाविद्यालय कायम विना- अनुदानित असून सदर महाविद्यालयातील पदे भरण्याची कार्यवाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठाच्या मान्यतेने संस्थेच्या व्यवस्थापन मंडळामार्फत करणे अपेक्षित आहे. विद्यापीठाकडून प्राप्त अहवालानुसार, सदर महाविद्यालयातील प्राचार्य पद दिनांक ०२/०६/२०२३ पासून रिक्त आहे. प्राचार्य, पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाला आहे. तथापि, या महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नोंदणीकृत संघटनांनी विद्यापीठाकडे आक्षेप नोंदविला आहे. सबब, सदर प्रकरणातील सर्व बाबींची उच्चस्तरीय समितीव्दारे शहानिशा केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे उचित निर्णय संबंधित संस्थेस कळविण्यात येणार आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.